# मुंबई विद्यापीठ

( नॅक पुनर्मूल्यांकनाव्दारे ३.६५ (सी.जी.पी.ए.) सह अ++ श्रेणी
विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा )


महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in ई-मेल :hrdc.recruitment@mu.ac.in दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४


**जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०६/२०२४, दि. ०३ सप्टेंबर, २०२४**

## थेट मुलाखत

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी व शाहिर अमरशेख अध्यासन येथे खालील पदे कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात थेट मुलाखतीव्दारे (**Walk in Interview**) भरावयाची आहेत. त्याकरीता इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांसह दिनांक **११ सप्टेंबर, २०२४** रोजी **सकाळी ११.०० ते दुपारी १.००** या कालावधीत विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

### १) लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | प्रतिमाह एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|
| १ | तालवाद्य प्रशिक्षक (Rhythm Instructor) | १ | रु. २६,०००/- प्रतिमाह |
| २ | वादक प्रशिक्षक (Instrument Instructor) | १ | |
| ३ | गायन प्रशिक्षक (Singing Instructor) | १ | |
| ४ | अभिनय प्रशिक्षक (Acting Instructor) | १ | |
| ५ | नृत्य प्रशिक्षक (Dance Instructor) | १ | |
| ६ | कलावंत समन्वयक (Artist Co-ordinator) | १ | रु. २४,०००/- प्रतिमाह |
| ७ | संशोधन समन्वयक (Research Co-ordinator) | १ | |
| ८ | द्रुकश्राव्य तंत्रज्ञ (Audio Video Technician) | १ | |
| ९ | वाद्य आणि कपडेपट सहायक (Curtain and Instrument Handler) | १ | रु. ११,०००/- प्रतिमाह |

..२..

## २) शाहिर अमरशेख अध्यासन, मुंबई विद्यापीठ

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | प्रतिमाह एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|
| १ | संशोधन समन्वयक (Research Co-ordinator) | १ | रु. २४,०००/- प्रतिमाह |
| २ | द्रुकश्राव्य तंत्रज्ञ (Audio Video Technician) | १ | |

**उपरोक्त पदांना आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| **१** | **तालवाद्य प्रशिक्षक** | १) प्रयोगात्म कला शाखेतील नृत्य, नाट्यशास्त्र, संगीत आणि प्रयोगात्म लोककलेची पदव्युत्तर पदवी / पदविका आवश्यक<br>२) प्रयोगात्म लोककला क्षेत्रातील संबंधित प्रशिक्षक पदाचा किमान १ वर्षे अनुभव<br>***किंवा***<br>१) नामांकित संस्थेत संबंधित प्रशिक्षक पदाचा ५ वर्षांचा अनुभव तसेच लोककला क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान देणारे असामान्य व्यक्तीमत्व.<br>***किंवा***<br>१) आकाशवाणी दुरदर्शनचे संबंधित क्षेत्रातील 'अ' श्रेणी प्रमाणपत्र धारक. |
| **२** | **वादक प्रशिक्षक** | |
| **३** | **गायन प्रशिक्षक** | |
| **४** | **अभिनय प्रशिक्षक** | |
| **५** | **नृत्य प्रशिक्षक** | |
| **६** | **कलावंत समन्वयक** | १) प्रयोगात्म लोककलेची पदव्युत्तर पदवीका किंवा मराठी लोकसाहित्यातील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) संबंधित क्षेत्रातील नामांकित संस्थेत संबंधित समन्वयक पदाचा किमान ३ वर्षे अनुभव. |
| **७** | **संशोधन समन्वयक** | |
| **८** | **द्रुकश्राव्य तंत्रज्ञ** | १) कोणत्याही सांविधानिक विद्यापीठाची पदवी.<br>२) शासकीय मान्यताप्राप्त संस्थेची साऊंड इंजिनिअरींग पदविका किंवा मान्यताप्राप्त संस्थेचे दृकश्राव्य तंत्रज्ञ प्रमाणपत्र.<br>३) लोककला क्षेत्रातील नामांकित संस्थेत ध्वनीमुद्रण समन्वयक/ द्रुकश्राव्य तंत्रज्ञ पदाचा किमान ३ वर्षे अनुभव. |
| **९** | **वाद्य आणि कपडेपट सहायक** | १) किमान १२ वी उत्तीर्ण.<br>२) नाट्य क्षेत्रातील नामांकित संस्थेत वाद्य आणि कपडेपट सहायक पदाचा किमान ३ वर्षे अनुभव. |

## अर्जदारांसाठी सूचना

१) उपरोक्त पदांकरीता मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी सोबत जोडलेला विहित नमुन्यातील अर्ज A-4 साईजच्या कागदावर संगणकीकृत करुन त्यासोबत विहित शैक्षणिक व अनुभवाच्या प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतींसह एक संच मुलाखतीस येतांना सोबत आणावा.

२) उमेदवारांनी अर्जात स्वत:चे पूर्ण नाव, अचुक पत्ता, मोबाईल क्रमांक व स्वत:चा वैध ई-मेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.

३) मुलाखतीस दिलेल्या वेळेच्या किमान अर्धा तास स्वखर्चाने उपस्थित राहावे. उशीरा येणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.

४) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात व ठोक मानधनावर भरण्यात येणार असल्याने या पदावरील कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

५) उपरोक्त सर्व पदांकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६) महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

७) मुलाखतीअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांच्या मुळ शैक्षणिक व अनुभवाच्या प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतरच नियुक्तीपत्र देण्यात येईल.

८) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सादर केलेली माहिती/प्रमाणपत्रे चुकीची/खोटी आढळल्यास त्याची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

९) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता हंगामी स्वरुपातील व ठोक मानधनावर भरण्यात येणार असून सदर पदांवर कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत उमेदवारांस कोणताही दावा करता येणार नाही. तसेच अशी विनंती केल्यास ती मान्य केली जाणार नाही. (संदर्भ : शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट, २००५)

१०) उपरोक्त पदांवर नियुक्त कर्मचाऱ्यांची सेवा ११ महिन्यानंतर आपोआप संपुष्ठात येईल. सदर कर्मचाऱ्यांची मागील कामगीरीचा आढावा घेऊन पुनर्नियुक्ती करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील.

११) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याकडून आवश्यक अटी व शर्ती अंतर्भुत करुन करारनामा करुन घेण्यात येईल.

१२) उपरोक्त पदांवर हंगामी स्वरुपातील नियुक्त कर्मचाऱ्यांची, आवश्यकतेनुसार कोणतीही पूर्वसूचना/कारणे न देता सेवा समाप्त करण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहतील.

१३) सदर जाहिरातीतील पदसंख्या, अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील. यासंदर्भात त्यांचा निर्णय अंतीम राहील.

सही/-
**कुलसचिव**
**मुंबई विद्यापीठ**

# अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,
मा. कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

**विषय** : ………………………………………. (लोककला अकादमी / शाहिर अमरशेख अध्यासन ) या पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.

**संदर्भ** : जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०६/२०२४, दि. ०३ सप्टेंबर, २०२४

१) **संपूर्ण नाव** (मराठीत) : ------------------------------------------------------------

२) **संपूर्ण नाव** (इंग्रजीत CAPITAL) : ------------------------------------------------------------

३) **प्रवर्ग** : --------------------------

४) **पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता** : ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

५) **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** : ------------------------------------------------------------

६) **ई मेल आयडी** : ------------------------------------------------------------

७) **जन्मतारीख** : ----------------------------------

८) **महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ?** होय /नाही

९) **शैक्षणिक अर्हता** :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

..२..

**१०) अनुभव :**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**११) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडल्या आहेत.**

१) -----------------------------------------------------

२) -----------------------------------------------------

३) -----------------------------------------------------

४) -----------------------------------------------------

५) -----------------------------------------------------

**मी असे प्रमाणित करतो / करते की, जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

**ठिकाण** : --------------------

**दिनांक** : -------------------

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**